**<u>निशाणी २४ वरील आदेश</u>**

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करिता दाखल केला आहे.

२. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द ताबा मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादीचे असे कथन की, प्रतिवादींनी सदर प्रकरणात त्यांचा लेखी जबाब नि.क्र.१२ वर दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे त्यांच्या लेखी जबाबात दुरुस्ती करु पाहत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांच्या लेखी जबाबातील अधिकचे कथन या सदरामध्ये परिच्छेद क्र.१० ओळ क्र.३ मध्ये रे.दि.मु.नं.५२/२०२३ च्या ऐवजी रे.दि.मु.नं.३२/२०२३ अशी दुरुस्ती करणे जरुरी आहे. तसेच प्रतिवादी यांच्या लेखी जबाबातील अधिकचे कथन या सदरामध्ये परिच्छेद क्र.१० ओळ क्र.७ मध्ये अर्जात नमूद केलेल्या मजकूराप्रमाणे प्रतिवादी हे त्यांच्या लेखी जबाबात दुरुस्ती करु पाहत आहे. त्यामुळे दाव्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, त्यामुळे प्रतिवादीने प्रस्तुत दुरूस्ती अर्ज मंजूर होण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. वादीने सदर अर्जाच्या मागील बाजूस आपले म्हणणे देवून विरोध दर्शविला व असे कथन केले की, प्रस्तुत प्रकरण हे पुराव्याकरिता असून सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा. सदरचा अर्ज हा कायदेशीर नसून तो रु.५,०००/- कॉस्ट बसवून नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. खालील मुद्दे या अर्जाच्या निकालासाठी उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे देण्यात आले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी मागणी केलेल्या अर्जानुसार दुरुस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## *का र ण मि मां सा*

**मुद्दा नं.१ चे संदर्भात -**

**५.** वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील अर्ज, त्यावरील म्हणणे, कागदपत्रे व एकंदर परिस्थिती विचारात घेता असे निदर्शनास येते की सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द ताबा मिळण्याकरिता दाखल केला आहे.

**६.** कायद्याच्या प्रस्थापित तत्वानूसार दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरूस्ती अर्ज विचारात घेताना दाव्याच्या गुणावगुणाचा विचार करणे अपेक्षित नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चा मुळ हेतू असा आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मुळ मुद्दा शोधून काढण्यासाठी खरी परिस्थिती अभिलेखावर आणून योग्य व न्याय दुरुस्ती करणे. न्यायाकरिता दाव्यामध्ये कधीही दुरूस्ती करण्याची परवानगी देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. जर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरूपात काही बदल होत नसेल तर दावा दुरूस्ती मान्य करण्यात यावी, असे करत असताना विरूद्ध पक्षकारास पुरेशी भरपाई देण्याबाबत विचार करावा तसेच दाव्याचे अनेकीकरण टाळून वादी व प्रतिवादी यांच्यातील दाव्याची संख्या मर्यादीत ठेवण्याच्या दृष्टीने दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित असते.

**७.** प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द ताबा मिळण्याकरिता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी तर्फे नि.क्र.१२ वर लेखी जबाब दाखल केला आहे. प्रस्तुत दावा वादीच्या उलटतपासाकरिता प्रलंबीत आहे. जर दाव्याचे स्वरुप बदलत नसेल तर

प्रतिवादीला लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने वादीला प्रतिवादी यांचा उलटतपास घेता येणार आहे. सदर दुरुस्तीने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच दाव्याचे अनेकीकरण न होता दाव्याची संख्या मर्यादीत ठेवण्यासाठी प्रस्तुतची दुरूस्ती करणे न्यायोचीत वाटते. त्यामुळे अभिलेखावरील वस्तुस्थिती विचारात घेता सदरील अर्जामध्ये तथ्य आहे असे मला वाटते. त्यामुळे सदर अर्ज कॉस्ट बसवून मंजुर करुन मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी लिहून मुद्दा क्र.२ करिता पुढील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज नि.क्र.२४ वरील अर्ज रु.२००/- कॉस्ट लावून मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमुद केलेली दुरुस्ती आज रोजी अथवा पुढील नेमलेल्या तारखेच्या आत करण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2025.08.29 16:45:38 +0530

( दिनेश मु. गायकवाड )
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), रिसोड.

दि.२६/०८/२०२५

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Order**.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade, (Grade-III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 26.08.2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 26.08.2025 |
| **Order uploaded on** | **:** | 29.08.2025 |